**महाराष्ट्र शासन (वन विभाग)**

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांचे कार्यालय.

**कॅम्प परिसर, अमरावती - 444602**

दुरध्वणी दुरध्वनी क्र. (0721) 2662090/ 2662593/ 2662680(वैयक्तिक)फॅक्स क्र. 2663314

ई-मेल : ccftamravati@mahaforest.gov.in/ aticcfa@gmail.com/ हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) 1926


**आदेश क्रमांक** : 36 **दिनांक** : 22/05/2026

**विषय : नियतकालीक बदल्या सन 2026**

गट-क सर्वेक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदलीने पदस्थापनेचे आदेश.

**संदर्भ** : 1. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-2017/प्र.क्र.415/कार्यासन 12, दिनांक 09 एप्रिल, 2018

2. वृत्तस्तरीय नागरी सेवा मंडळ समिती सभा दिनांक 22/05/2026

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-7/आस्था/मुले/प्र.क्र.182/241/21-22, दिनांक 06/08/2021 अन्वये, गठीत नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक 22/05/2026 रोजी संपन्न झाली, सदर बैठकीत नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशीस अनुसरुन, खालील तक्त्यात नमूद केलेल्या गट-क सर्वेक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र 3 मध्ये नमूद केलेल्या पदावरुन स्तंभ क्र. 4 येथे दर्शविलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

**संवर्ग : सर्वेक्षक**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम (सर्वश्री) | कार्यरत ठिकाण | बदली व पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | सागर शिवाजी मुळे | विभागीय कार्यालय, बुलडाणा (प्रादे.), वनविभाग, बुलडाणा. | विभागीय कार्यालय, अकोला (प्रादे.) वनविभाग, अकोला. | श्री.विशाल शंकरराव देशमुख, सर्वेक्षक यांचे बदलीने रिक्त पदी. |
| 2 | विशाल शंकरराव देशमुख | विभागीय कार्यालय, अकोला (प्रादे.) वनविभाग, अकोला. | विभागीय कार्यालय, अकोट वन्यजीव विभाग, अकोट. | श्री.रामा सोमा जामकर, सर्वेक्षक यांचे बदलीने रिक्त पदी. |
| 3 | संदीप बबनराव ठाकरे | संचालनालय, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती कार्यालय. | विभागीय कार्यालय, अमरावती (प्रादे.), वनविभाग, अमरावती. | रिक्त पदी. |
| 4 | रामा सोमा जामकर | विभागीय कार्यालय, अकोट वन्यजीव विभाग, अकोट. | विभागीय कार्यालय, बुलडाणा (प्रादे.), वनविभाग, बुलडाणा. | श्री. सागर शिवाजी मुळे, सर्वेक्षक यांचे बदलीने रिक्त पदी. |

1. सदर बदली व पदस्थापना झालेल्या कर्मचाऱ्यांना बदलीचे ठिकाणी रुजू होण्याकरीता, कोणत्याही सबबीचा विचार न करता स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच, संबंधित कर्मचारी बदलीचे ठिकाणी रुजू झाल्यानंतर तसा रुजू अहवाल या कार्यालयास सादर करावा.
2. संबंधित कर्मचारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, 1981 च्या नियम 15 अन्वये, विहित केलेल्या उक्त तरतूदींनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुध्द लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1950 व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील तरतूदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
3. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, 1981 मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित कर्मचारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी, अन्यथा पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

4. वरील संबंधित कर्मचारी त्यांचे नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होईपर्यंत या कार्यालयाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करणे, तसेच म.ना.से. (रजा) नियम, 1981 मधील नियम 30 (सी) नुसार मुळ कार्यालयात बदली झालेल्या कर्मचारी यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नये. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पत्यावर नोंदणी पोच देय डाकेने संबंधितांना परत करावेत.

5 सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील नियम 23 चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

Jayoti Banerji 22/5/26

(जयोती बॅनजी)
**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक), अमरावती**

**क्रमांक** : **कक्ष-8/आस्था/TN-1/नियतकालीक बदल्या 2026/** 570 **/2026-27**
**अमरावती-2, दिनांक** 22/05/2026
**प्रति,**

वरील अ.क्र. 01 ते 04 समोरील सर्वेक्षक (सर्व),
**मार्फत** : संबंधित नियंत्रक अधिकारी

**प्रतिलिपी** : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलिपी** : वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहितीस अग्रेषित.
**प्रतिलिपी** : उप वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, अमरावती यांना माहितीस अग्रेषित.
**प्रतिलीपी** : उपवनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती / अकोला / बुलडाणा वनविभाग यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.
**प्रतिलिपी** : उपवनसंरक्षक, मे.व्या.प्र, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.
**प्रतिलिपी** : **आदेश फाईल.**

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सत्यमेव जयते अमरावती

Jayoti Banerji

(जयोती बॅनजी)
**मुख्य वनसंरक्षक**
**(प्रादेशिक), अमरावती**